# रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

(ग्राम पंचायत विभाग)

## जाहीर सूचना

---

**विषय : संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, जिल्हा परिषद स्वनिधी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविणे या योजनेअंतर्गत पात्र भजनी मंडळांकडून प्रस्ताव मागविण्याबाबत.**

रायगड जिल्हा परिषदेच्या स्वनिधी योजनेंतर्गत संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविण्याची नावीन्यपूर्ण योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत पात्र भजनी मंडळांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

इच्छुक व पात्र भजनी मंडळांनी आपले प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायत / पंचायत समिती यांच्यामार्फत दिनांक ०४/०९/२०२६ पर्यंत सादर करावेत.

## योजनेच्या अटी व शर्ती:

1. ग्रामसभा / मासिक सभा ठराव प्रत सादर करणे आवश्यक.
2. मंडळाची कार्यकारिणी असणे आवश्यक.
3. मंडळ गावात कार्यरत असल्याबाबत ग्रामपंचायतीचा दाखला सादर करणे आवश्यक.
4. साहित्य ठेवण्यासाठी उपलब्ध जागा असल्याबाबत मंडळाचा दाखला सादर करणे आवश्यक.
5. भजनी मंडळाचा देखभाल व दुरुस्ती करणेस तयार असल्याबाबत भजनी मंडळाचा दाखला सादर करणे आवश्यक.
6. गट विकास अधिकारी यांचे भजनी मंडळ अटींची पूर्तता करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक.
7. वरील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र भजनी मंडळांनी विहित मुदतीत आपले प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती किंवा ग्राम पंचायत विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याशी संपर्क साधावा.